# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६६८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १२/१०/२०१६

**१) रिलायन्स टॉवरला लावलेला कॉपर वायरची चोरी . :–**

दिनांक १०+११/१०/२०१६ चे रात्र दर. यातील जाभंडी शेतशिवारातील रिलायन्स टॉवरला लावलेला ९ कॉपर वायर ५० फुट लांब कि. २०,०००/–रु. चे कोणीतरी अज्ञात चोराने कापुन चोरून नेल्याने फिर्यादी प्रदीप भैयालाल रहांगडाले वय २६ वर्ष रा. डोंगरला पो.स्टे तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) मद्य प्राशन करुन शिविगाळ व दुखापत केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ११/१०/२०१६ रोजी २०.३० वा. दर. यातील फिर्यादी व आरोपी हे सख्खे भाऊ असुन एकाच घरात वेगवेगळया खोलीत राहत आहे. यातील आरोपी हा दारु पिवुन जोरजोरात आपल्या पत्नीस व आई वडीलास शिविगाळ करीत असतांना फिर्यादीने आरोपीला शिविगाळ का करतोस असे हटकले असता आरोपी हा फिर्यादीचे जवळ येवुन त्यास पकडुन डावे हाताचे भुजे जवळ चावा घेतला व आपखुशीने दुखापत करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी जियेन्द्र गणेश गजभिये वय ३१ वर्ष, रा. खैरलांजी यांचे व डॉ. परिक्षण रिपोर्ट वरून पोस्टे. साकोली येथे कलम ३२४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) अल्पवयीन मुलगा घरुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिंनाक. ०६/१०/२०१६ रोजी १०.०० वा. दर. यातील फिर्यादीचा अल्पवयीन मुलगा सोमेश्वर अंबादास शेंडे वय १५ वर्ष, हा मावस भावाचे घरी गेला असता कोणाला न सांगता निघुन गेल्याने व अज्ञात आरोपी इसमाने फुस लावुन पळवुन नेले असे फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पा. स्टे. मौदा जि. नागपुर येथे अप. क्र. ००/१६ क. ३६३ भांदवि चे कागदपत्र पो. शि. गि–हेपुंजे पो. स्टे. मौदा यांनी आणुन हजर केल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. राघोर्ते पा. स्टे. तुमसर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे तुमसर येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो. स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**४) लोखंडी रॉडने डोक्यावर मारुन जखमी केले . :–**

दिनांक ११/१०/२०१६ रोजी २०.५० वा. दर. यातील फिर्यादी विशाल रुपचंद गजभिये वय २९ वर्ष, रा. तुमसर हा दसरा पाहुण जात असतांना यातील आरोपी हा कोणातरी सोबत भांडण करीत असतांना त्याला सोडविण्यास गेला असता आरोपीने फिर्यादीस लोखंडी रॉडने डोक्याचे उजवे बाजुला मारुन जखमी करुन शिविगाळ केल्याने फिर्यादीचे व डॉ. परीक्षण रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२४,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाने पो. स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**५) मुलीला लग्नाचे आमीष दाखवुन अत्याचार केल्याने गुन्हा नोंद. :–**

माहे एप्रील २०१० ते आज पावेतो यातील आरोपीने फिर्यादीला लग्नाचे आमिष दाखवुन वेळोवेळी तिचेवर अत्याचार करुन तिला ०६ महीण्याची गर्भधारणा होण्यास कारणीभुत होवुन तिच्याशी लग्नास नकार देवुन फसवणुक केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३७६,४१७ भांदवि. सहकलम ३(२)(व्ही.ए) अ.जा.ज.अ.प्र.का सुधारीत कायदा २०१५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोनी. भोयर पो. स्टे. लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

६) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–

दिनांक ११/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ५६ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०३ केसेस व ईतर वाहनांवरती ५३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता